सोमवार दि. ०३ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३३३ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जिव्हाळा हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या सेवा कायम करण्यासाठी हिवाळी अधिवेशनात आवाज उठवणार -आ. अर्जुन खोतकर

## महाराष्ट्र समुदाय आरोग्य संघटना ५७१७ च्या जालना जिल्हा मेळाव्यात आश्वासन

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्र समुदाय आरोग्य संघटना ५७१७, जालना यांच्या वतीने रविवारी (दि. २ ऑगस्ट) जालना येथील सुयश लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेला समुदाय आरोग्य अधिकारी (सीएचओ) जिल्हा मेळावा उत्साहात संपन्न झाला. राज्यभरातील समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या, विशेषतः सेवा कायम करण्याचा प्रश्न या मेळाव्याच्या केंद्रस्थानी होता. यावेळी आमदार अर्जुन खोतकर यांनी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या मागण्या योग्य असल्याचे सांगत त्यांना संपूर्ण पाठिंबा जाहीर केला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी आमदार अर्जुन खोतकर होते. कार्यक्रमाला माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, शिवसेनेचे नेते भाऊसाहेब घुगे, जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, पंडित भुतेकर, विष्णुभाऊ पाचफुले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गजानन म्हस्के



तसेच एनसीडी () समन्वयक डॉ. संदीप गोरे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली. जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये कार्यरत मोठ्या संख्येने समुदाय आरोग्य अधिकारी या मेळाव्यास उपस्थित होते.

**सेवा कायम करण्यासाठी विधानसभेत ठामपणे पाठपुरावा करणार**

अध्यक्षीय भाषणात आमदार अर्जुन खोतकर यांनी समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी केलेल्या कार्याचे कौतुक केले. कोविड काळासह विविध आरोग्य मोहिमांमध्ये सीएचओंनी बजावलेल्या भूमिकेचा उल्लेख करत त्यांनी त्यांच्या मागण्यांना न्याय मिळायला हवा, असे सांगितले.

केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सहा वर्षे सेवा पूर्ण केलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याची तरतूद असल्याचा उल्लेख करत, हा मुद्दा येत्या *(पान २ वर)*

# पंतप्रधानांच्या व्हर्च्युअल संवादातून युवकांना नशामुक्त भारताचा संदेश

**जालना -प्रतिनिधी**

'नशा मुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियान' अंतर्गत भारताचे माननीय पंतप्रधान यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी व्हर्च्युअल संवाद कार्यक्रमाचे आयोजन जालना येथील शासकीय रुग्णालय परिसरातील नर्सिंग महाविद्यालयात उत्साहात करण्यात आले. मेरा



युवा भारत (माय भारत), जालना तसेच युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचे नियोजन जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांनी नशामुक्तीची सामूहिक शपथ घेतली. त्यानंतर माननीय पंतप्रधानांच्या व्हर्च्युअल संवादाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून पंतप्रधानांनी युवकांनी व्यसनांपासून *(पान २ वर)*

# प्रत्येक घरावर राष्ट्रध्वज फडकवून अभियान यशस्वी करा - जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

आगामी हर घर तिरंगा अभियान यशस्वी करण्यासाठी भाजपा जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्ह्याची संयुक्त नियोजन बैठक भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे संपन्न झाली. या बैठकीस भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी आमदार कैलासजी गोरंट्याल, महापौर वंदना मगरे, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, देवदास कुचे, संध्याताई देठे, जिजाबाई



जाधव, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी शेजूळ, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, गोविंद ढेंबरे, रमेश भापकर, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, भगवान मात्रे, अमोल धानुरे, प्रदीप पवार, संजय आटोळे, विष्णू जाधव, आदींसह भाजपा महानगर व ग्रामीण जिल्ह्यातील पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, मोर्चा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत १० ते १३ ऑगस्टदरम्यान तिरंगा यात्रा, युवक व महिला मोर्चाच्या सहभागातून जनजागृती, शहीद स्मारक व महापुरुषांच्या स्मारक परिसरात स्वच्छता अभियान, तसेच वीर सैनिक व शहीद जवानांच्या कुटुंबीयांचा सन्मान करण्याबाबत सविस्तर नियोजन करण्यात आले. तसेच १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत प्रत्येक घरावर तिरंगा *(पान २ वर)*

# जालना जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या शाळांवर बाल हक्क आयोगाची थेट कारवाई

## मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकाऱ्यांना अर्धन्यायिक सुनावणीचे समन्स

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या मोडकळीस आलेल्या इमारती, पडझड झालेल्या वर्गखोल्या आणि मूलभूत सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याची स्वतः हून (सुओ-मोटो) दखल घेत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने जिल्हा प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले आहे. आयोगाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांना अर्धन्यायिक (-) सुनावणीसाठी उपस्थित राहण्याची नोटीस बजावली असून, संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर कार्यवाही अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

आयोगाच्या सचिव (प्र.) वंदना जैन यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आलेल्या नोटिशीनुसार, ७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथील महसूल भवनात सुनावणी होणार आहे. या सुनावणीत संबंधित अधिकाऱ्यांनी लेखी कार्यवाही अहवाल, सर्व मूळ कागदपत्रे आणि दुरुस्तीबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. आयोगाने प्रसिद्ध झालेल्या वृत्तांची दखल घेत म्हटले आहे की, जालना जिल्ह्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांमध्ये वर्गखोल्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असून छतांचे सिमेंट निखळत आहे, भिंतींना मोठे तडे गेले आहेत, पावसाळ्यात वर्गखोल्यांमध्ये पाणी गळत आहे. काही ठिकाणी विद्यार्थी विंचू, साप यांसारख्या धोकादायक परिस्थितीत शिक्षण घेत असल्याचे समोर आले आहे. अशा परिस्थितीत बालकांच्या जीविताला प्रत्यक्ष धोका निर्माण झाल्याची गंभीर नोंद आयोगाने घेतली आहे. विशेष म्हणजे, २०२६-२७ चे शैक्षणिक वर्ष सुरू होऊन बराच कालावधी उलटूनही अनेक शाळांची दुरुस्ती न झाल्याबद्दल आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रशासनाने पुरेशी तत्परता



प्रत्येक बालकाला सुरक्षित, सुसज्ज आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण मिळणे हा त्याचा मूलभूत हक्क आहे. या हक्काचे संरक्षण, संवर्धन आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग वैधानिक अधिकारांच्या आधारे कटिबद्ध असून, बालकांच्या शिक्षणाशी तडजोड करणाऱ्या कोणत्याही बाबीकडे गांभीर्याने पाहिले जाईल.

**-डॉ. संजय लाखे पाटील**
**सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग**

दाखवली नसल्याचा ठपकाही नोटिशीतून स्पष्टपणे दिसून येतो. आयोगाने या प्रकरणात भारतीय न्याय संहिता () तसेच भारतीय दंड विधानातील () संबंधित तरतुदींच्या संभाव्य उल्लंघनाचाही उल्लेख केला आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ प्रशासकीय नव्हे तर कायदेशीर दृष्टिकोनातूनही पाहिले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुनावणीपूर्वी संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगाच्या ई-मेलवरही पाठविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच सुनावणीवेळी *(पान २ वर)*

# जायकवाडी धरणाची द्वारे कोणत्याही क्षणी उघडण्याची शक्यता; गोदावरी नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

## मुसळधार पावसामुळे धरणात ४६,६१७ क्यूसेक्स पाण्याची आवक

**पैठण । प्रतिनिधी**

मराठवाड्याचे जीवनदायी समजल्या जाणाऱ्या जायकवाडी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे धरणातील पाणीसाठ्यात वेगाने वाढ होत असून, धरणाची द्वारे कोणत्याही क्षणी उघडण्यात येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जायकवाडी पाटबंधारे विभागाने गोदावरी नदीकाठच्या गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा जारी केला आहे.

जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), पैठण येथील कार्यकारी अभियंत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या जायकवाडी प्रकल्पात ८३.३९ टक्के जिवंत पाणीसाठा असून तो १,८१०.३६१ दलघमी इतका झाला आहे. पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे धरणात ४६,६१७ क्यूसेक्स वेगाने पाण्याची आवक होत आहे. पुढील काही तासांत पाण्याच्या आवकेत आणखी वाढ होण्याची शक्यता असल्याने धरणातील पाण्याचे नियोजन करण्यासाठी आवश्यकतेनुसार धरणाची द्वारे उघडण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

धरणातून पाणी सोडण्यात आल्यानंतर गोदावरी नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होऊ शकते. त्यामुळे नदीपात्रात किंवा नदीकाठच्या सखल भागात असलेल्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने नदीपात्रात तटस्नानासाठी गेलेल्या नागरिकांनी तात्काळ बाहेर यावे, नदीकाठावर उभी असलेली वाहने सुरक्षितस्थळी हलवावीत तसेच नदीपात्रात किंवा काठावर चरणारी जनावरे त्वरित सुरक्षित ठिकाणी नेण्याच्या सूचना दिल्या आहेत. मासेमारी करणारे, वाळू उपसा करणारे तसेच नदीपात्रात इतर कोणत्याही कारणासाठी जाणाऱ्या नागरिकांनी पुढील सूचना मिळेपर्यंत नदीकाठापासून दूर राहावे, असेही प्रशासनाने म्हटले आहे. गोदावरी नदीकाठच्या सर्व गावांतील ग्रामपंचायती, महसूल विभाग *(पान २ वर)*

# प्राचार्य जवाहर काबरा यांनी सर केले जगातील सर्वोच्च उमलिंगला पास

## वयाच्या ६७ व्या वर्षी जिद्द आणि सायकलिंग साहसाचा नवा विक्रम

**जालना - प्रतिनिधी**

वयाची ६७ वर्षे उलटूनही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर अशक्य गोष्टी शक्य करता येतात, हे जालना येथील प्राचार्य जवाहर काबरा यांनी सिद्ध करून दाखवले आहे. नुकत्याच पार पडलेल्या युथ हॉस्टल्स असोसिएशन ऑफ इंडियाद्वारे आयोजित लेह-उमलिंगला पास सायकल एक्सपीडिशनमध्ये सहभागी होऊन त्यांनी तब्बल १९,०२४ फूट उंचीवर सायकल चालवण्याचा पराक्रम केला आहे.

२० ते ३० जुलै दरम्यान आयोजित या मोहिमेत प्रा. काबरा यांनी ३६५ किलोमीटरचा दुर्गम प्रवास



सायकलद्वारे पूर्ण केला. लेहपासून (११,५०० फूट) सुरू झालेला हा प्रवास शारा, चूमाथांग, न्योमा, हांले आणि चूसुमले अशा विविध टप्प्यांतून उमलिंगला पासपर्यंत पोहोचला. विशेष म्हणजे मोहिमेच्या अंतिम टप्प्यात १३,९०० फुटांवरून थेट १९,०२४ फुटांपर्यंतची *(पान २ वर)*

# जुना जालन्यात कथित गोमांस जप्तीवरून तणाव; बजरंग दलाचे ठिय्या आंदोलन, मनपाची मटन मार्केटवर कारवाई

## दुकानावर पोलिसांचा छापा; बजरंग दल व काही नागरिकांमध्ये वाद, महापालिका परिसरात आंदोलनानंतर अतिक्रमण हटविण्याची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जुना जालना परिसरातील मटन मार्केटमध्ये रविवारी कथित गोमांस विक्री व गोवंश हत्येच्या संशयावरून पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. या कारवाईदरम्यान बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या उपस्थितीत संबंधित दुकानावर छापा टाकण्यात आल्याचा दावा केला असून, पोलिसांनी संशयित मांस ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. तथापि, हे मांस गोमांस असल्याची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही. घटनेनंतर बजरंग दलाचे कार्यकर्ते आणि खाटीक समाजातील काही नागरिक यांच्यात जोरदार बाचाबाची झाली. काही वेळातच वादाचे रूपांतर धक्काबुक्की व गोंधळात झाल्याने परिसरात तणाव निर्माण झाला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप केला.

बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांचा आरोप आहे की, पोलिस कर्मचारी घटनास्थळी उपस्थित असतानाच त्यांच्यावर काही व्यक्तींनी हल्ला केला. काही कार्यकर्त्यांवर तीक्ष्ण हत्याराने हल्ला झाल्याचाही आरोप करण्यात आला. या प्रकरणी संबंधितांवर कठोर आणि तातडीची कायदेशीर कारवाई



करण्याची मागणी कार्यकर्त्यांनी केली आहे. मात्र, या आरोपांबाबत पोलिसांकडून अधिकृत माहिती समोर आलेली नाही. बजरंग दलाच्या म्हणण्यानुसार, त्यांनी मिळालेल्या माहितीनुसार पोलिस प्रशासनाला पूर्वसूचना देऊनच कारवाई केली होती. त्यामुळे कारवाईदरम्यान कार्यकर्त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी पोलिस प्रशासनाने घ्यायला हवी होती, असे त्यांचे म्हणणे आहे.

**महापालिका परिसरात ठिय्या आंदोलन**

घटनेनंतर संतप्त झालेल्या बजरंग दल व गौरक्षक कार्यकर्त्यांनी संशयित मांस महापालिका परिसरात आणून ठिय्या आंदोलन सुरू केले. यावेळी पोलिस आणि महापालिका प्रशासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. ''गोवंश हत्या थांबवा'', ''अवैध मटन मार्केटवर कारवाई करा'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कार्यकर्त्यांनी संबंधित मटन मार्केट महापालिकेच्या मालकीच्या जागेवर सुरू असल्याचा दावा करत, अशा प्रकारचे बांधकाम आणि व्यवसाय इतक्या काळापासून सुरू असतानाही प्रशासनाने कारवाई का केली नाही, असा सवाल उपस्थित केला. तसेच या प्रकरणात प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करत काही आरोपही करण्यात आले. मात्र, या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

**आंदोलनानंतर महापालिकेची** *(पान २ वर)*

# संपादकीय...

## हरणांचा उपद्रव की व्यवस्थेचे अपयश?

### शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण आता केवळ आश्वासनांनी नव्हे, तर ठोस धोरणानेच शक्य

जालना तालुक्यातील विरेगाव शिवारात हरणांच्या कळपांनी कोवळ्या खरीप पिकांचे केलेले नुकसान ही केवळ एका गावाची समस्या नाही. महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये वन्य प्राण्यांचा वाढता वावर आणि त्यामुळे होणारे शेतीचे नुकसान हे आता गंभीर कृषी व पर्यावरणीय आव्हान बनले आहे. यंदा अत्यल्प पावसामुळे आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी हा उपद्रव म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखा आहे. शेतकरी आज दुहेरी नव्हे तर तिहेरी संकटाचा सामना करत आहे. एकीकडे अनियमित पाऊस, दुसरीकडे वाढते उत्पादन खर्च आणि तिसरीकडे वन्य प्राण्यांकडून पिकांची नासधूस. पेरणीसाठी कर्ज काढायचे, बियाणे व खतांवर हजारो रुपये खर्च करायचे, आणि पीक उगवताच ते हरणांच्या कळपांनी फस्त करायचेही परिस्थिती कोणत्याही शेतकऱ्यासाठी असह्य आहे. वन्यजीवांचे संरक्षण ही राज्याची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. हरणांसारखे वन्य प्राणी निसर्गाचा महत्त्वाचा घटक आहेत. परंतु वन्यजीवांचे संरक्षण आणि शेतकऱ्यांचे संरक्षण या दोन्ही गोष्टी परस्परविरोधी नसून पूरक असायला हव्यात. वन्यजीव वाचले पाहिजेत, पण त्यासाठी शेतकऱ्यांचा बळी दिला जाऊ नये. पर्यावरण संवर्धन आणि अन्नदात्याचे हित यामध्ये समतोल राखणारे धोरणच काळाची गरज आहे. प्रश्न केवळ हरणांचा नाही; प्रश्न व्यवस्थापनाचा आहे. ज्या भागांत वन्य प्राण्यांचा नियमित वावर आहे, त्या भागांचे वैज्ञानिक सर्वेक्षण झाले आहे का? नुकसानग्रस्त क्षेत्रांची नोंद ठेवली जाते का? प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे वार्षिक नियोजन केले जाते का? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे अद्याप मिळत नाहीत. प्रत्येक वर्षी तक्रारी, पंचनामे आणि भरपाईच्या मागण्या होतात; मात्र कायमस्वरूपी उपाययोजना मात्र कागदावरच राहतात. वन विभागाने केवळ घटना घडल्यानंतर पंचनामे करण्यापुरती भूमिका न घेता प्रतिबंधात्मक उपायांवर भर देण्याची गरज आहे. सौर कुंपण, साखळी जाळी, नैसर्गिक अडथळे, वन्यजीवांना पर्यायी अधिवास, नियमित गस्त आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सहभागातून संरक्षण व्यवस्था उभारणे यांसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या पाहिजेत. त्याचबरोबर पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने करून भरपाईची रक्कम वेळेत देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शेतकऱ्यांना भरपाई मिळण्यात होणारा विलंब ही आणखी एक गंभीर समस्या आहे. नुकसान एका दिवसात होते; मात्र पंचनामे, कागदपत्रे आणि प्रशासकीय प्रक्रियेमुळे मदत मिळण्यासाठी अनेक महिने वाट पाहावी लागते. संकटाच्या काळात उशिरा मिळालेली मदत ही प्रत्यक्षात मदत राहत नाही. त्यामुळे भरपाईची प्रक्रिया अधिक पारदर्शक, डिजिटल आणि वेळबद्ध करणे आवश्यक आहे. विरेगावची घटना प्रशासनासाठी इशारा आहे. आज विरेगाव, उद्या दुसरे गावअशी परिस्थिती कायम राहिली तर शेती करणे दिवसेंदिवस कठीण होईल. त्यामुळे वन विभाग, कृषी विभाग आणि जिल्हा प्रशासन यांनी संयुक्त कृती आराखडा तयार करून तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या पिकांचे संरक्षण ही केवळ आर्थिक बाब नाही; ती राज्याच्या अन्नसुरक्षेशी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडित आहे. त्यामुळे हरणांचा उपद्रव हा केवळ वन्यजीवांचा प्रश्न म्हणून न पाहता तो शेती, पर्यावरण आणि प्रशासन यांच्या समन्वयाचा विषय म्हणून हाताळला पाहिजे.

# अशोक फदाट बाबूजींचा सेवानिवृत्ती सोहळा संपन्न

**जाफराबाद -प्रतिनिधी**

सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद येथे मुख्य लिपिक या पदभार सांभाळताना आपल्या सेवाभावी वृत्तीने आणि तत्परतेने सर्वांची मने जिंकणारे अशोक हरिबा फदाट (बाबूजी) यांचा सेवानिवृत्ती सोहळा अत्यंत भावूक आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. आयुष्यातील खडतर संघर्षावर मात करत अत्यंत सचोटीने कर्तव्य बजावणाऱ्या फदाट बाबूजींच्या निवृत्तीच्या वेळी उपस्थितांचे डोळे पाणावले, तर स्वतः अशोक फदाट यांनाही भावना अनावर होऊन अश्रू अनावर झाले.

संघर्षातून उभा राहिलेला ध्येयवादी प्रवास

अशोक फदाट बाबूजींचा सुरुवातीचा जीवनप्रवास अत्यंत बिकट आणि संघर्षाने भरलेला होता. परंतु, कोणत्याही परिस्थितीसमोर हार न मानण्याच्या त्यांच्या जिद्दीमुळे त्यांनी सिद्धार्थ महाविद्यालयात नोकरी मिळवली. आपल्या कार्यकाळात त्यांनी मुख्य लिपिक पदाची जबाबदारी अत्यंत सचोटी, निष्ठेने आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडत आयुष्याला एक आदर्श दिशा दिली.

पालक अन् विद्यार्थ्यांचे हक्काचे मार्गदर्शक जाफराबाद तालुक्यातील आणि लगतच्या ग्रामीण भागात एक वेगळाच विश्वास निर्माण झाला होता. महाविद्यालयात येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांच्या कागदपत्रांशी संबंधित सर्व शंकांचे निरसन करून, त्यांना योग्य ते मार्गदर्शन करूनच समाधानपूर्वक परत पाठवणे ही बाबूजींची कामाची हातोटी होती. मुख्य लिपिक या जबाबदारीच्या पदावर असतानाही त्यांनी ठेवलेल्या या आपुलकीच्या स्वभावामुळे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्यात त्यांचे अप्रत्यक्षपणे मोलाचे योगदान राहिले.

**मान्यवरांची उपस्थिती आणि भावूक सत्कार**

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सिल्लोड शिक्षण संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब म्हस्के तर व्यासपीठावर सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य राहुल म्हस्के, यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर, प्राध्यापक, कर्मचारी, माजी विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी अध्यक्ष दादासाहेब म्हस्के यांच्या हस्ते अशोक फदाट बाबूजी व त्यांच्या धर्मपत्नी सौ. संगीताताई अशोक फदाट यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन भावूक वातावरणात विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी अशोक फदाट यांच्या समर्पित सेवेचा गौरव करत त्यांना पुढील वाटचालीस उदंड आणि निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

# खड्डेच खड्डे चोहीकडे... गेला रस्ता कुणीकडे...?

पाऊस आणि रस्त्यांवरील खड्डे हे आता जणू समीकरणच बनले आहे. थोडासा पाऊस झाला की रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडतात. दरवर्षी पावसाळ्यात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिकसह राज्यातील जवळपास सर्वच शहरांमध्ये खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होते. यंदाही परिस्थिती वेगळी नाही. काही ठिकाणी तर रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यांत रस्ता, हेच ओळखू येत नाही.

ही समस्या केवळ शहरांपुरती मर्यादित नाही. राज्य व राष्ट्रीय महामार्गांवरही मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. मग ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था किती बिकट असेल, याची कल्पनाच केलेली बरी. परिणामी वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. दुचाकीस्वार, रुग्णवाहिका, शालेय बस आणि सामान्य नागरिक यांना रोज जीवघेण्या प्रवासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे दरवर्षी शेकडो अपघात होतात. अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. नाशिकमध्ये खड्ड्यांमुळे चार नागरिकांचा मृत्यू झाल्याची घटना अत्यंत वेदनादायी आहे. केवळ नाशिकच नव्हे, तर देशातील अनेक शहरांमध्ये खड्ड्यांमुळे जीवितहानी होत आहे. तरीही जबाबदार यंत्रणांची संवेदनशीलता जागी होताना दिसत नाही.

दरवर्षी शासन रस्ते बांधणी व दुरुस्तीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करते. मग एवढा पैसा खर्च होऊनही रस्ते काही महिन्यांतच उखडतात कसे? याचे उत्तर निकृष्ट दर्जाचे काम, भ्रष्टाचार आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणात दडलेले आहे. ठेकेदार, संबंधित अधिकारी आणि काही लोकप्रतिनिधी यांच्या साटेलोट्यामुळे जनतेचा पैसा अक्षरशः खड्ड्यांत जात आहे.

पावसाळ्यात नागरिकांच्या तक्रारी वाढल्या की खड्ड्यांवर तात्पुरते डांबर टाकून दिखाऊ दुरुस्ती केली जाते. काही दिवसांनी पुन्हा तेच खड्डे उघडे पडतात आणि पुन्हा नव्या कामाच्या नावाखाली निधी खर्च होतो. त्यामुळे खड्डे हे काही ठेकेदारांसाठी ''सोन्याची अंडी देणारी कोंबडी'' ठरले आहेत, अशी भावना नागरिकांच्या मनात निर्माण होणे स्वाभाविक आहे.

यावर कायमस्वरूपी उपाय करायचा असेल तर केवळ घोषणांनी भागणार नाही. ज्या ठेकेदाराच्या कामात दोष आढळतील त्याला काळ्या यादीत टाकले पाहिजे. निकृष्ट कामाला प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. संबंधित लोकप्रतिनिधींनाही जबाबदार धरले पाहिजे. आवश्यक असल्यास निकृष्ट रस्त्यांचा संपूर्ण खर्च दोषींकडून वसूल करण्याची कठोर तरतूद केली पाहिजे. रस्ते हे विकासाचे प्रतीक असतात; पण तेच मृत्यूचे सापळे बनत असतील, तर तो विकास नव्हे, तर व्यवस्थेचा पराभव आहे. शासनाने ठेकेदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या अभद्र युतीवर कठोर कारवाई केली, तरच ''खड्डेमुक्त महाराष्ट्र'' हे स्वप्न साकार होईल. अन्यथा दरवर्षी पाऊस पडेल, खड्डे पडतील, अपघात होतील आणि आश्वासनेही तशीच पडून राहतील.

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जि. पुणे**

# भोकरदनचे सामाजिक वनीकरणच बेपत्ता...?

**भोकरदन -प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली दरवर्षी वृक्षलागवडीचे गाजावाजा,घोषणा, फोटोसेशन आणि अहवालांचा पाऊस पडतो; मात्र प्रत्यक्षात लावलेली झाडे जगली किती? या मूलभूत प्रश्नाचे उत्तर देण्याची वेळ आली की प्रशासनाचे मौन सुरू होते. त्यामुळे भोकरदन तालुक्यातील सामाजिक वनीकरणाच्या कामकाजावर गंभीर संशयाची छाया निर्माण झाली आहे.गतवर्षी हजारो रोपे लावल्याचे दावे करण्यात आले.पण त्या रोपांचे आज अस्तित्व किती आहे, त्यांची निगा राखली का, किती रोपे सुकली आणि संवर्धनासाठी खर्च झालेल्या निधीचे फलित काय, याचा स्पष्ट हिशोब उपलब्ध नाही.परिणामी वृक्षलागवड ही पर्यावरणासाठी की केवळ कागदोपत्री आकडे वाढविण्यासाठी? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत.यंदा जालना जिल्ह्यासाठी २० लाख, तर भोकरदन तालुक्यासाठी १२ हजार वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. विविध विभागांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या असल्या, तरी निम्मा पावसाळा संपत आला तरी प्रत्यक्ष कामाचा वेग दिसत नाही.वृक्षलागवडीचा सर्वात अनुकूल कालावधी हातातून निसटत असताना प्रशासनाची तातडी नेमकी कुठे हरवली, असा सवाल उपस्थित होत आहे.सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी आर.पेहेकर यांच्याशी संपर्क साधण्याचा वारंवार प्रयत्न करण्यात आला; मात्र प्रतिसाद मिळू शकला नाही.त्यामुळे विभागाची भूमिका समजू शकली नाही.आज भोकरदनसमोरचा प्रश्न फक्त १२ हजार रोपे लावण्याचा नाही, तर लाखो रुपयांच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी आणि जबाबदारी निश्चित करण्याचा आहे. वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणार.

पान १ व ४ वरुन...

## समुदाय आरोग्य...

हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित करणार असून शासन स्तरावर त्यासाठी ठामपणे पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन आमदार खोतकर यांनी दिले. त्यांच्या या घोषणेला उपस्थित समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.

**समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या मागण्यांवर चर्चा**

मेळाव्यात समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. सेवा कायम करणे, सेवाशर्तींमध्ये सुधारणा, नोकरीची सुरक्षितता, कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच ग्रामीण आरोग्य व्यवस्थेत समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची भूमिका अधिक प्रभावी करण्याबाबत अनेकांनी आपली मते मांडली.

उपस्थित मान्यवरांनीही समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे कार्य महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करत त्यांच्या प्रश्नांकडे शासनाने सकारात्मक दृष्टीने पाहण्याची गरज व्यक्त केली.

**जिल्हा कार्यकारिणीची बिनविरोध निवड**

या मेळाव्यात महाराष्ट्र समुदाय आरोग्य संघटना ५७१७ च्या जालना जिल्हा कार्यकारिणीची सर्वानुमते बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

**नवीन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे**

जिल्हाध्यक्ष : डॉ. संजय लाटे
उपाध्यक्ष : डॉ. कमल बनकर
जिल्हा सचिव : डॉ. योगेश बागल
कोषाध्यक्ष : डॉ. गणेश वाघ

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करत संघटनेच्या माध्यमातून समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी प्रभावीपणे काम करण्याच्या शुभेच्छा दिल्या.

**आभार प्रदर्शनाने मेळाव्याची सांगता**

कार्यक्रमाच्या शेवटी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ. सोपान चव्हाण यांनी उपस्थित मान्यवर, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य तसेच जिल्ह्याच्या विविध भागांतून सहभागी झालेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांचे आभार मानले. उत्साही वातावरणात आणि संघटनेच्या विविध ठरावांसह मेळाव्याची यशस्वी सांगता झाली.

## पंतप्रधानांच्या...

दूर राहून निरोगी, सक्षम व जबाबदार नागरिक म्हणून विकसित भारताच्या निर्मितीत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन केले. त्यांनी नशामुक्त भारताच्या संकल्पनेचा संदेश देत युवकांना सकारात्मक जीवनशैली स्वीकारण्याचे आवाहन केले.

यावेळी जनविकास बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष मनोहर सरोदे, नर्सिंग महाविद्यालयाचे पाठ्यनिर्देशक पराग जोशी, राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र () चे ज्ञानेश्वर सावरकर, युवा बहुउदेशीय संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड, नर्सिंग महाविद्यालयाचे चंद्रकांत मुंढे तसेच ब्रह्मकुमारी शीतल दीदी यांची प्रमुख उपस्थिती होती. समारोपप्रसंगी विद्यार्थिनी मृण्मयी सरकटे, आकांक्षा वरकड, पल्लवी सुरुसे, वैष्णवी गवळी तसेच विद्यार्थी सागर पांढरे, रोहित मगर आणि श्रीकांत पवार यांनी नशामुक्त भारताच्या संकल्पनेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, स्वयंसेवक उत्स्फूर्त प्रतिसाद देत नशामुक्त भारताच्या संकल्पनेला पाठिंबा दर्शविला.

## प्रत्येक घरावर....

फडकविणे, सामाजिक माध्यमांवर अभियानाचा व्यापक प्रचार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. माजी आमदार कैलासजी गोरंट्याल म्हणाले, स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आणि शहीद जवानांच्या बलिदानाची आठवण करून देणारे हे अभियान समाजाला राष्ट्रप्रेमाचा संदेश देणारे आहे. युवा कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन तिरंग्याचा सन्मान राखत प्रत्येक नागरीकापर्यंत राष्ट्रभक्तीचा संदेश पोहोचवावा.

यावेळी भास्कर आबा दानवे म्हणाले, ''हर घर तिरंगा हे केवळ ध्वज फडकविण्याचे अभियान नसून प्रत्येक भारतीयाच्या मनात राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि तिरंग्याविषयी अभिमान जागविण्याचा लोकसहभागाचा उत्सव आहे. प्रत्येक बूथ, प्रत्येक वॉर्ड आणि प्रत्येक घरापर्यंत हे अभियान पोहोचवून जालना जिल्हा राज्यात राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन हे अभियान यशस्वी करावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी सोपान पेंढारकर, सिद्धिविनायक मुळे, रमेश गौरक्षक, राजेंद्र भोसले, सुहास मुंडे, भागवत बावणे, आनंद झारकंडे, शिवराज नारीयलवाले, कल्याण भदनेकर, वैशाली बनसोडे, बाबा उगले, सुभाष सले, बाबुराव भवर, सिद्धेश्वर हजबे, प्रमोद गंडाळ, गणेश कोल्हे, शाम उगले, संतोष खंडेलवाल, समर्पण विजयसेनानी, एकनाथ मोरे, पद्माकर जऱ्हाड, जितेंद्र पालकर, राजू साळवे, चेतन देसरडा, हेमंत भुरेवाल, रोषण चौधरी, अजित मानधनी, सोमेश काबलिये, राहुल यादव, शाम जाधव, नंदकिशोर पिंगळे, बाबासाहेब कराळे, गोरखनाथ खैरे, दीपक मुडलीक, संजय वाघमारे, उद्धव काळे, गणेश बावणे, सुरेश लहाने, नंदकिशोर पाटील, कैलास सोळुंके, विकास कदम, यश खरात, बद्री भसांडे, अमोल भवर, राजाराम जाधव, पंकज किल्लेदार, हरिभाऊ गोरे, सुदर्शन काळे, गौरव गोधेकर, सुधाकर शिंदे, अकबर परसूवाले आदींची उपस्थिती होती.

## जालना जिल्ह्यातील...

सर्व मूळ अभिलेख सादर करणे आवश्यक राहणार आहे. आयोगाने स्पष्ट इशारा दिला आहे की, विहित वेळेत सुनावणीस अनुपस्थित राहिल्यास किंवा समाधानकारक अहवाल सादर न केल्यास महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ मधील कलम १४ व १५ अंतर्गत प्रशासकीय तसेच कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जालना जिल्ह्यातील मोडकळीस आलेल्या शाळांच्या प्रश्नावर राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने थेट हस्तक्षेप केल्यामुळे आता जिल्हा प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, याकडे विद्यार्थी, पालक आणि संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## जायकवाडी धरणाची...

आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि स्थानिक प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. पाण्याची आवक वाढल्यास धरणातून अधिक प्रमाणात विसर्ग करण्यात येऊ शकतो, त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जायकवाडी पाटबंधारे विभागाने केले आहे.

प्रशासनाने नागरिकांना विनाकारण नदीपात्रात जाणे टाळण्याचे, लहान मुलांवर विशेष लक्ष ठेवण्याचे तसेच आपत्कालीन परिस्थितीत स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. धरणाची द्वारे उघडण्याबाबतचा अंतिम निर्णय परिस्थितीनुसार घेतला जाणार असून, त्याबाबतची अधिकृत माहिती वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे कार्यकारी अभियंत्यांनी स्पष्ट केले आहे.

## जुना जालन्यात...

**कारवाई**

महापालिका परिसरात आंदोलन सुरू झाल्यानंतर प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या. त्यानंतर जुना जालना परिसरातील संबंधित मटन मार्केटवर महापालिकेच्या पथकाने अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू केली. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत ही मोहीम राबविण्यात आली.

कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न केला.

वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी, कदीम जालना पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जनार्दन शेवाळे यांच्यासह मोठा पोलिस फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेत संबंधितांना शांततेचे आवाहन केले. दरम्यान, कथित गोमांस जप्ती, हल्ल्याचे आरोप, बजरंग दलाचे आंदोलन आणि त्यानंतर महापालिकेने केलेली कारवाई यामुळे जुना जालना परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या मांसाचा नमुना न्यायवैद्यकीय किंवा प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे का, हल्ल्याच्या आरोपांबाबत गुन्हा दाखल झाला आहे का आणि महापालिकेच्या कारवाईबाबत प्रशासनाची अधिकृत भूमिका काय आहे, याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणातील पुढील कायदेशीर आणि प्रशासकीय घडामोडीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## प्राचार्य जवाहर ...

५ हजार फुटांची खडतर चढाई पूर्ण करताना त्यांच्या शारीरिक क्षमतेसह मानसिक दृढतेचीही मोठी परीक्षा झाली. या प्रवासात काबरा यांना केवळ उंच डोंगररांगाच नव्हे, तर कंपा देणारी थंडी, जोरदार वारे, कधी पाऊस तर कधी प्रखर सूर्यप्रकाशाचा सामना करावा लागला. एवढेच नव्हे तर हॅन्ले ते चूसुमले दरम्यानचा २५ किमीचा कच्चा रस्ताही अत्यंत आव्हानात्मक होता. मात्र, जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे सर्व अडथळे पार केले. या मोहिमेत देशभरातील १५ सायकलपटू सहभागी झाले होते, ज्यांनी या कठीण प्रवासात एकमेकांना मोलाची साथ दिली.

केवळ सायकलिंगच नाही, तर या निमित्ताने लडाखच्या निसर्गाचा आणि तेथील जनजीवनाचा जवळून परिचय झाला. या प्रवासात तीन दिवस स्थानिक लडाखी कुटुंबांसोबत राहिल्यामुळे तिथली संस्कृती, खानपान आणि आदरातिथ्य अनुभवण्याची संधी मिळाल्याचे काबरा यांनी सांगितले. मोहिमेच्या शेवटी लेह येथे आयोजित कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन सर्व सायकलपटूंचा गौरव करण्यात आला. वयाच्या ६७ व्या वर्षी जवाहर काबरा यांनी साध्य केलेले हे यश केवळ जालना जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण ज्येष्ठ नागरिकांसाठी एक प्रेरणादायी आदर्श आहे.

## जिल्हा परिषदेतील...

निर्माण होत असल्याचा दावा शेजूळ यांनी केला आहे.

याच पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्हा परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने निदर्शने आणि बेमुदत ठिय्या आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. हे आंदोलन पूर्णपणे शांततापूर्ण, संविधानिक आणि लोकशाही मार्गाने करण्यात येईल. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आयोजक प्रयत्नशील राहतील, असेही त्यांनी म्हटले आहे. मात्र, मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्यास निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीची नैतिक व प्रशासकीय जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

जनहित, शेतकरी हित आणि प्रशासनातील पारदर्शकता अबाधित राहावी, ग्रामीण विकास कामांतील कथित अनियमिततेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच संबंधित अधिकाऱ्यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत पदावरून बाजूला करण्यात यावे, अशी मागणी शिवाजी संतराम शेजूळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

## अखिल भारतीय...

पवार, विद्या जाधव (पत्रकार) तसेच समाजातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नियुक्तीनंतर उपस्थित मान्यवरांनी प्रा. राजेंद्र जाधव यांचे अभिनंदन करून मराठवाड्यातील कैकाडी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी, युवकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, शिक्षण, संघटन आणि सामाजिक ऐक्य वाढविण्यासाठी प्रभावी कार्य करावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

## नाशिकच्या बहुचर्चित...

सूड उगवणे नसून सुधारणेची शक्यता तपासणे हाही असतो. आरोपींचा कोणताही पूर्वदोषसिद्धीचा इतिहास नव्हता आणि त्यांच्यातील सुधारणेचे दरवाजे पूर्णपणे बंद झालेले नाहीत, हे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने राज्य सरकारची फाशीची पुष्टी करणारी याचिका फेटाळून लावली. शेवटी, ॲड. महेश धनावत यांनी स्पष्ट केले की, न्यायालयाने आरोपींची निर्दोष मुक्तता केलेली नाही, तर त्यांना दिलेल्या शिक्षेचे स्वरूप अधिक कठोर व स्पष्ट केले आहे. चेतन पगारे आणि अमन जट यांना भादंवि कलम ३०२, ३६४-अ आणि १२०-ब अंतर्गत दोषी धरून ३० वर्षे कोणतीही माफी किंवा सवलत न देता तुरुंगात राहावे लागेल. हा निर्णय एका बाजूला पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देणारा आहे, तर दुसऱ्या बाजूला फाशीच्या शिक्षेबाबतच्या कायदेशीर सिद्धांतांचे योग्य संतुलन साधणारा आहे.

## शालेय व्यवस्थापन...

खोसे सर ,विद्यार्थी व सचिवपदी शाळेचे मुख्याध्यापक खैसे सर अभिजीत खरात हे पदसिद्ध सचिव म्हणून निवड करण्यात आली.यावेळी नूतन अध्यक्ष ,उपाध्यक्ष व सदस्यांचा सत्कार करण्यात आला यावेळेस विविध वर्गातील विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते .सूत्रसंचालन पदवीधर शिक्षक खोसे सर यांनी केले . यावेळेस मुख्याध्यापक खैसे सरहा अभिजीत सर यांनी मार्गदर्शन केले .यावेळेस सर्व शिक्षक उपस्थित होते.तसेच ही निवड प्रक्रिया खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. निवड झालेल्या अध्यक्षा व उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचे उपस्थित पालक बाबन पठाण मोसीन पठाण वजिम शेख फेरेज शेख रहीम शेख वर्ग शिक्षक वृंदावन यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## माध्यमांच्या दणक्याने महावितरणला जाग

# विरेगावसह दहा गावांचा वीजपुरवठा रात्रीच सुरळीत

### मीटर कनेक्शन कमी असल्याच्या कारणावरून वीजपुरवठा खंडित झाल्याचा ग्रामस्थांचा दावा

**घनसावंगी । प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील डांबरी उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या विरेगावसह तब्बल दहा गावांचा वीजपुरवठा मीटर कनेक्शनची संख्या अपुरी असल्याच्या कारणावरून खंडित करण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला होता. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले. मात्र, या संदर्भातील वृत्त माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर महावितरण प्रशासनाने तातडीने दखल घेत रात्रीच वीजपुरवठा पूर्ववत केल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

मिळालेल्या माहितीनुसार, डांबरी उपकेंद्राअंतर्गत विरेगाव, हस्तेपिंपळगाव, हिवर्डी, धानोरा, आनंदनगर, सिंगाडी, पोखरी तसेच परिसरातील अन्य गावांचा वीजपुरवठा शनिवारी सायंकाळपासून अचानक बंद झाला होता. पावसाळ्याचे दिवस सुरू असताना अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना अंधारात रात्र काढावी लागली. घरगुती कामे, विद्यार्थ्यांचा अभ्यास, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तसेच इतर दैनंदिन व्यवहारांवर त्याचा परिणाम झाला.



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, वीजपुरवठा बंद करण्यापूर्वी महावितरणकडून कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नव्हती. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून वीज तात्काळ सुरू करण्याची मागणी केली.

यावेळी गावातील मीटर कनेक्शनची संख्या कमी असल्याने आवश्यक कनेक्शन वाढविल्याशिवाय वीजपुरवठा सुरळीत करता येणार नसल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आल्याचा दावा ग्रामस्थांनी केला. या कारणामुळे नियमितपणे वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांनाही वीजपुरवठ्यापासून वंचित राहावे लागल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. '

'काही कारणास्तव मीटर कनेक्शनची संख्या कमी असेल, तर त्याची शिक्षा संपूर्ण गावाला का?'' असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला. नियमित बिल भरणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा कोणतीही पूर्वसूचना न देता बंद करणे अन्यायकारक असल्याचे मतही अनेकांनी व्यक्त केले.

या संपूर्ण प्रकाराची माध्यमांनी दखल घेत सविस्तर वृत्त प्रसिद्ध केल्यानंतर महावितरण प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेत रात्रीच वीजपुरवठा पूर्ववत केला. त्यामुळे विरेगावसह सर्व प्रभावित गावांमध्ये पुन्हा वीजपुरवठा सुरळीत झाला.

वीजपुरवठा सुरू झाल्यानंतर ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. मात्र, भविष्यात अशा प्रकारे कोणतीही पूर्वकल्पना न देता सामूहिक वीजपुरवठा खंडित करू नये, तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचणी असल्यास त्याची माहिती आधी नागरिकांना द्यावी आणि ग्रामीण भागात नियमित, अखंड व दर्जेदार वीजपुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत मीटर कनेक्शनच्या कारणास्तव वीजपुरवठा बंद करण्यात आल्याच्या ग्रामस्थांच्या दाव्याबाबत महावितरणची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## ग्रामीण रुग्णालयात पत्रकाराशी दादागिरी वैद्यकीय अधीक्षक डॉ. दुर्गवाड यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध रोष




**परतूर - प्रतिनिधी**

रुग्णालयातील सावळागोंधळ लपवण्यासाठी दडपशाही उपविभागीय अधिकारी व पोलिसांत तक्रार दाखला

शासकीय रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे आणि कारभार जनतेसमोर मांडणाऱ्या पत्रकाराचा आवाज दाबण्याचा गंभीर प्रकार परतूर येथे उघडकीस आला आहे परतूर ग्रामीण रुग्णालयात बातमी संकलनासाठी गेलेल्या पत्रकारास छायाचित्रण करण्यापासून रोखून त्यांच्याशी अत्यंत अरेरावीची भाषा वापरत सार्वजनिक ठिकाणी अपमानित करण्यात आले रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ दुर्गवाड यांनी केलेल्या या मुजोर वर्तनाविरोधात माहिती अधिकार तथा पत्रकार संरक्षण समिती सह तालुक्यातील पत्रकार बांधव आक्रमक झाले असून संबंधित अधिकाऱ्यावर कडक प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार सिरसमगाव येथील रहिवासी माहिती अधिकार तथा पत्रकार संरक्षण समिती चे तालुकाध्यक्ष तसेच युट्यूब न्यूज चॅनेलचे संपादक मारोती उमाजी घोरबांड हे परतूर ग्रामीण रुग्णालयात सकाळी आलेल्या पथका संदर्भात माहिती घेण्यासाठी आणि रुग्णालय परिसरातील वस्तूस्थितीचे बातमी संकलन करण्यासाठी गेले होते पत्रकारीतेचे कर्तव्य बजावत असताना आणि रुग्णालयाचा परिसर व रुग्णांची स्थिती कॅमेऱ्यात टिपत असताना तेथील वैद्यकीय अधीक्षक डॉ दुर्गवाड यांनी त्यांना अचानक अटकाव केला तू इथे फोटो आणि व्हिडीओ का काढतोस असा उच्छाद मांडत डॉ दुर्गवाड यांनी पत्रकार घोरबांड यांच्याशी थेट हुज्जत घातली रुग्णालयातील इतर कर्मचारी रुग्ण आणि उपस्थित नागरिकांसमोर घोरबांड यांना अर्वाच्च शब्दात अपमानित केले व माहिती देण्याऐवजी दडपशाही केली रुग्णालयात माहिती नक्की लपवतोय कोण

शासकीय रुग्णालये ही जनतेच्या आरोग्यासाठी असतात आणि तेथील समस्याश सोयी सुविधा किंवा रुग्णांचे हाल जनतेसमोर आणणे हा लोकशाहीचा अधिकार आहे मात्र माहिती देऊन सहकार्य करण्याऐवजी पत्रकारालाच धमकावणे आणि छायाचित्रण रोखणे यावरून ग्रामीण रुग्णालयात असा कोणता गैरकारभार चालला आहे.

जो लपवण्याचा प्रयत्न डॉ दुर्गवाड करत आहेत असा संतप्त सवाल आता नागरिक आणि पत्रकार वर्गातून विचारला जात आहे प्रशासकीय आणि पोलीस दरबारी तक्रार दाखल पत्रकार मारोती घोरबांड यांनी या अन्यायाविरुद्ध तात्काळ प्रशासकीय स्तरावर आक्रमक पावले उचलली जावीत म्हणून प्रशासनाकडे विनंती केली आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालय परतूर यांना निवेदन देण्यात आले.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी



**जालना - प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उदयनगर येथे अण्णाभाऊ साठे मित्र मंडळ यांनी विशेष कार्यक्रमाचे आयोजन किशोर पाखरे, आकाश पाखरे, राहुल पाखरे, अजय पांजगे आणि दीपक पाखरे यांनी केले. व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. प्रमुख वक्ते प्रा. सचिन निसर्गण सर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्य, साहित्य आणि सामाजिक योगदानावर मार्गदर्शन केले.जयंतीनिमित्त शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमही उत्साहात पार पडला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित मान्यवरांनी वृक्ष लागवड केली. या कार्यक्रमास विशेष उपस्थित सर्व मान्यवर तसेच शाळेचे मुख्याध्यापक : कळकटे सर, शिक्षक मोरे सर, शालेय समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष व मित्र आणि समस्त गावकरी तसेच सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ जालना येथील संस्थाचालक भानुदास डोबाळे सर यांनी देखील विशेष मार्गदर्शन केले.

## ज्ञानेश्वर गोराडे यांचा सेवा गौरव उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

हडको येथील भारतीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री ज्ञानेश्वर गोराडे सर यांच्या सेवा गौरव सोहळ्यानिमित्त मराठवाड्याचे लोकप्रिय शिक्षक आमदार तथा महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष, मुख्य प्रतोद ,महाराष्ट्र विधान परिषद (कॅबिनेट मंत्री दर्जा) विक्रम काळे व उपस्थित मान्यवर यांनी त्यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांच्या पुढील आयुष्यासाठी आणि चांगल्या आरोग्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. सरानी शिक्षक सेवा बजावताना अनेक सामाजिक उपक्रमातून विद्यार्थीना मार्गदर्शन केले. गावातील दारूबंदी, नाशमुक्त गाव, स्वच्छ गाव हरित गाव संकल्पना सरानी प्रभावीपणे राबवली असे माजी शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, यांनी प्रतिपादन केले. यावेळी संस्थाचे संस्थापक अशोक पाटील भायगावकर यांच्या कार्याची प्रशंसा करण्यात आली. प्रा. डॉ. अशोक पवार, शिक्षण व आरोग्य सभापती सौ. अनिताताई ज्ञानेश्वर मोठे, सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन ज्ञानेश्वर मोठे, मनपाचे गटनेते किशोर नागरे, मनपा स्थायी समितीचे सदस्य राजगौरव वानखेडे, ह.भ.प. त्र्यंबक महाराज काकडे, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप विखे, राष्ट्रवादी शिक्षक संघ प्राथमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष एम. एम. खुटे, कार्याध्यक्ष वाहेद शेख, सचिव रमाकांत छडीदार, पी. एन. जाधव, माजी मुख्याध्यापक जाधव, दौड, संस्था सचिव अभिनंदन पाटील व पाटील, हिंदी शिक्षक, संस्था पदाधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, मित्र मंडळ निल्लोडचे सरपंच उत्तम शिंदे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रवीण वैष्णव यांनी केले तर हितेश गोरडे यांनी आभार व्यक्त केले.



राजकुंवर कॉलेज हिवरा येथिल विद्यार्थिनी कु. रुपाली वाघमारे हिची महाराष्ट्र पोलिस पदी पुणे येथे निवड झाली तिचा सत्कार करताना कॉलेजचे प्राचार्य लक्ष्मण हिवरेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला तिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या यावेळी प्रा. शंकरसिंग छानवाल प्रा . द्यानेश्वर बोरुडे प्रा. अजय शिंदे प्रा . विजय खरात प्रा. संतोष खोतकर प्रा. किरण तबडे प्रा. समाधान कबाडे तसेच पालक नवनाथ वाघमारे विशाल कदम /शिक्षकेतर कर्मचारी गणेश खरात सूत्र संचालन सार्थक भोसले यांनी केले आभार प्रा समाधान कबाडे यांनी केले. सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## वडोद बाजार येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

**फुलंब्री - प्रतिनिधी**

वडोद बाजार येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त साहित्य रत्न अण्णाभाऊ साठे सभागृह परिसरात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, समाजप्रबोधन आणि सामाजिक समतेसाठीच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले.

पूर्वी बलुतेदारी असल्याने समाज बांधवांनी नाचून संसाराचा गाडा पुढे आणला परंतु आता परिस्थिती बदलली आहे . आता नाचून नाहीतर वाचून समाज प्रगती करत आहे असे मत जेष्ठ



पत्रकार दादासाहेब काळे यांनी व्यक्त केले . जि प सदस्य डॉ गोपाल वाघ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अण्णाभाऊ साठे यांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला . व जयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या . यावेळी या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य डॉ. गोपाल वाघ, सरपंच पती साबेर पठाण, दादासाहेब काळे, रमेश दणके, आजीनाथ वाघ, ताजामत शहा, त्रिंबक शिनगारे, बंडू शिनगारे, राजू म्हस्के, गणेश म्हस्के, काकाजी कोलते, शेख सलीम, रमेश डिडोरे, राहुल भिवसने, इंद्रा भिवसने, अनिल ऋषी, लक्ष्मण पवार, माणिक डेरे, सचिन तोरणमल, विष्णु म्हस्के, रामू ऋषी, रामदास दणके, संतोष भालेराव, सुनील कांबळे, इंदुबाई केवट, अशोक केदारे, शिवाजी काटकर, मिलिंद नवतुरे, फिकीरचंद दणके, वसंत दणके कडुबा दणके, रमेश साठे, ऋषी दणके, गणेश दणके, लखन दणके, राम दणके, विशाल दणके गणेश कांबळे आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचलन रमेश दणके यांनी तर आभार सुनिल कांबळे यांनी व्यक्त केले . हा कार्यक्रम शांततापूर्ण व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. उपस्थितांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा समाजात प्रसार करण्याचा निर्धार या वेळी व्यक्त केला. दुपार नंतर डि जे तालावर तरुणाईने थिरकत मिरवणुक काढण्यात आली होती. जवळपास तीन तासापेक्षा जास्त वेळ मिरवणुक काढण्यात आली होती.

## प्लास्टिकवर नगरपरिषदेचा सर्जिकल स्ट्राईक

### भोकरदनात ३० किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त;नियमभंग करणाऱ्यांकडून ₹२२ हजारांचा दंड वसूल

**भोकरदन -प्रतिनिधी**

पर्यावरण संरक्षणाचा निर्धार करत प्लास्टिक मुक्त भोकरदन या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत भोकरदन नगरपरिषदेने शहरात सिंगल यूज प्लास्टिकविरोधात धडक मोहीम राबवली. या विशेष कारवाईत सुमारे ३० किलो प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले, तर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांकडून तब्बल ₹२२ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याधिकारी गजानन तायडे यांच्या नेतृत्वात शहरासह आठवडी बाजार परिसरात घनकचरा व्यवस्थापन नियम,२०२६ आणि सिंगल यूज प्लास्टिक बंदी अंतर्गत ही विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.तपासणीदरम्यान विविध दुकाने, व्यावसायिक आस्थापने व विक्रेत्यांची पाहणी करण्यात आली. ज्या ठिकाणी बंदी असलेल्या प्लास्टिक पिशव्या, कप, ग्लास, प्लेट, चमचे, स्ट्रॉ, थर्माकोल साहित्य आढळून आले, त्या ठिकाणी तात्काळ जप्तीची कारवाई करत संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, साठवणूक, विक्री अथवा वितरण करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही नियमित, कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई सुरू राहणार आहे. त्यामुळे व्यापारी, विक्रेते, फेरीवाले तसेच सर्व आस्थापनांनी शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.नागरिकांना कापडी पिशव्या,कागदी पिशव्या व इतर पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याचे आवाहन करत ''माझे शहर, माझी जबाबदारी'' या संकल्पनेतून प्रत्येकाने प्लास्टिकमुक्त, स्वच्छ आणि हरित भोकरदन घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही प्रशासनाने नमूद केले.ही कारवाई कार्यालयीन अधीक्षक नामदेव गाडेकर, नगर अभियंता अजय व्यवहारे, संगणक अभियंता विलास तावडे, पंजाबराव जाधव, गोवर्धन सोनवणे, आशा पगारे, अनिकेत दानवे, शाकेर पठाण, शेख जावेद व कुणाल बिरारे यांनी संयुक्तपणे यशस्वीरीत्या पार पाडली.

# जबरी चोरीप्रकरणातील सराईत टोळीवर मोक्काची कारवाई

## दावलवाडीतील हॉटेल विसावा येथे तलवारीच्या धाकावर ₹२६ हजारांची लूट; दोन आरोपींना अटक, विशेष पोलीस महानिरीक्षकांची मोक्कासाठी मंजुरी

**बदनापूर | प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यात घातक शस्त्रांचा धाक दाखवून जबरी चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीविरोधात बदनापूर पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत मोठी कारवाई केली आहे. दावलवाडी शिवारातील हॉटेल विसावा येथे तलवारीने हल्ला करून रोख रक्कम लुटल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींविरुद्ध विशेष पोलीस महानिरीक्षकांनी मोक्का लागू करण्यास मंजुरी दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ जून २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास दावलवाडी (ता. बदनापूर) शिवारातील हॉटेल विसावा येथे ही घटना घडली होती. फिर्यादी आकुंश निवृत्ती बोचरे हे हॉटेल परिसरात असताना कारमधून आलेल्या आरोपींनी त्यांना घातक शस्त्रांचा धाक दाखवला. त्यानंतर धारदार तलवारीने त्यांच्या डोक्यावर वार करून गंभीर दुखापत केली आणि त्यांच्या खिशातील २६ हजार रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच त्या रात्री गस्तीवर असलेले बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांनी तातडीने पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून आरोपींनी वापरलेल्या कारचा क्रमांक मिळविला. त्यावरून तपासाची दिशा निश्चित झाली आणि आरोपींची ओळख पटली.

तपासादरम्यान आरोपींची नावे पप्पू कचरू घोरपडे (वय ३२) आणि नवनाथ शिवदास नाईकवाडे (वय ३२), दोघेही रा. खतगाव, ता. बदनापूर, जि. जालना अशी निष्पन्न झाली. पोलिसांनी दोघांनाही अटक करून त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरण्यात आलेली कार, धारदार शस्त्र तसेच लुटीतील रक्कम जप्त केली.

त्यानंतर घेण्यात आलेल्या ओळख परेडीत फिर्यादी आकुंश बोचरे यांनी आरोपींची ओळख निश्चित केली. तपासादरम्यान आरोपींचा गुन्हेगारी इतिहास उघडकीस आला.

पोलिसांच्या माहितीनुसार, दोन्ही आरोपींवर मागील दहा वर्षांत एकूण १४ गंभीर गुन्हे दाखल असून विविध पोलीस ठाण्यांमध्ये त्यांच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न, घातक शस्त्राने हल्ला, खंडणी वसुली, जबरी चोरी, घरफोडी, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, दहशत पसरविणे आणि गंभीर दुखापत करणे यांसारखे गुन्हे नोंद आहेत. यामध्ये मुख्य आरोपी पप्पू कचरू घोरपडे याने इतर साथीदारांसह आर्थिक फायद्यासाठी संघटित गुन्हेगारी टोळी स्थापन करून विविध ठिकाणी गंभीर स्वरूपाचे गुन्हे केल्याचे तपासात समोर आले. या पार्श्वभूमीवर जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या आदेशानुसार बदनापूर पोलीस ठाण्याने आरोपींविरुद्ध मोक्का कायद्यांतर्गत कारवाईचा प्रस्ताव सादर केला होता.

या प्रस्तावास छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी मंजुरी दिल्यानंतर संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांनी सांगितले की, ''बदनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत शस्त्रांचा वापर करून दहशत निर्माण करणाऱ्या, जनतेमध्ये भीतीचे वातावरण तयार करणाऱ्या आणि स्वतःला गुंड म्हणून प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरूच राहील.''

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक एस. आर. कुकलारे, पोलीस कॉन्स्टेबल परमेश्वर ढगे, विकास घाटगे, पी. के. गोलवाल, एस. जे. तडवी आणि चालक पोलीस कॉन्स्टेबल रामेश्वर सानप यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आदर्श इंग्लिश स्कूलच्या वेदिका भोजनेची यशाला गवसणी



**अंबड - प्रतिनिधी**

जामखेड येथील आदर्श इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी कु. वेदिका सीमा राजेंद्र भोजने हिने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यावतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. वेदिकाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. गंगाधरजी पांढरे, उपाध्यक्षा सौ. आशाताई पांढरे, मुख्याध्यापिका सौ. ज्योतीसिंह हजारी यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिच्या या यशाचे कौतुक करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.

विद्यार्थिनीच्या या यशामुळे शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला असून, परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# जिल्हा परिषदेतील कथित भ्रष्टाचाराविरोधात बेमुदत ठिय्या आंदोलनाचा इशारा

## अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंत्यांना पदावरून बाजूला करण्याची मागणी

### *शिवाजी शेजूळ यांचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन*

**जालना | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद जालना अंतर्गत ग्रामीण रस्ते व बांधकाम विभागातील कथित आर्थिक अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे आणि संबंधित अधिकाऱ्यांवर अद्याप कोणतीही प्रभावी प्रशासकीय कारवाई करण्यात आलेली नसल्याच्या निषेधार्थ सोमवार, दि. ३ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा अर्जदार शिवाजी संतराम शेजूळ यांनी दिला आहे. याबाबत त्यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.

शेजूळ यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, यापूर्वी ३० जून, २ जुलै, ७ जुलै आणि १६ जुलै २०२६ रोजी विविध निवेदनांद्वारे जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण रस्ते व बांधकाम कामांमध्ये झालेल्या कथित आर्थिक अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे, बिले काढताना झालेली कथित नियमबाह्य कार्यपद्धती, काही कंत्राटदारांना झालेला कथित अनुचित लाभ तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेबाबत सविस्तर तक्रारी प्रशासनाकडे सादर करण्यात आल्या होत्या.

मात्र, या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी असूनही आजपर्यंत कोणतीही ठोस आणि परिणामकारक प्रशासकीय कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यामुळे तक्रारदारांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात विशेषतः अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शिरीष बनसोडे आणि कार्यकारी अभियंता (बांधकाम) सौ. सविता शालगर यांच्यावर आरोपांचा उल्लेख करण्यात आला असून, या अधिकाऱ्यांना अद्याप त्यांच्या पदावरून बाजूला करण्यात आले नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांना पदावर कायम ठेवल्यामुळे निष्पक्ष चौकशीवर परिणाम होण्याची शक्यता असून, त्यामुळे कथित गैरव्यवहाराला अप्रत्यक्ष प्रशासकीय संरक्षण मिळत असल्याची भावना जनतेमध्ये (पान २ वर)

# अखिल भारतीय कैकाडी महासंघाच्या मराठवाडा अध्यक्षपदी प्रा. राजेंद्र जाधव यांची नियुक्ती

**बीड - प्रतिनिधी**

अखिल भारतीय कैकाडी महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने बीड येथे आयोजित राज्यव्यापी कैकाडी समाज मेळाव्यात प्रा. राजेंद्र जाधव यांची मराठवाडा अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. महासंघाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. संजयजी मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष मा. श्री. दिगंबर जाधव (पत्रकार) यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. समाज संघटन मजबूत



करणे, शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी कार्य करणे आणि मराठवाड्यातील कैकाडी समाजाला संघटित करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी यावेळी प्रा. जाधव यांच्यावर सोपविण्यात आली. या नियुक्तीप्रसंगी समाजाचे ज्येष्ठ अशोक गायकवाड, ताराचंद जाधव, राजू जाधव सर, माजी नगरसेवक संजय गायकवाड, दीपक जाधव, युवा जिल्हाध्यक्ष कुणाल जाधव, संजय जाधव, विकी (पान २ वर)

# नाशिकच्या बहुचर्चित विपिन बाफना अपहरण व खून प्रकरणातील आरोपींची फाशीची शिक्षा रद्द; ३० वर्षांच्या सश्रम कारावासात रुपांतरित

**नाशिक - प्रतिनिधी**

नाशिक येथील चर्चित विपिन बाफना याच्या अपहरण आणि निर्घृण खून प्रकरणात बॉम्बे उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. विशेष म्हणजे, विशेष न्यायालयाने आरोपी चेतन यशवंतराव पगारे आणि अमन प्रकटसिंग जट यांना दिलेली फाशीची शिक्षा उच्च न्यायालयाने रद्द केली असून, तिचे रूपांतर कोणत्याही सवलतीशिवाय ३० वर्षांच्या जन्मठेपेत केले आहे. या प्रकरणातील कायदेशीर घडामोडींबाबत आणि न्यायालयाच्या निर्णयावर स्पष्टीकरण देताना ॲड. महेश धनावत म्हणाले की, न्यायालयाचा हा निकाल न्यायव्यवस्थेतील दुर्मिळातील दुर्मिळ या सिद्धांताची अचूक अंमलबजावणी दर्शवणारा आहे. ॲड. महेश धनावत यांच्या वक्तव्यानुसार, जून २०१३ मध्ये घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि अस्वस्थ करणारी होती. २२ वर्षांच्या विपिन बाफना याचे १ कोटी रुपयांच्या खंडणीसाठी अपहरण करून त्याची हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात विशेष न्यायालयाने आरोपींचे कृत्य समाजमनाला धक्का देणारे मानून त्यांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली होती. मात्र, उच्च न्यायालयात कलम ३६६ अन्वये फाशीच्या शिक्षेच्या पुष्टीकरणासाठी आलेल्या याचिकेवर आणि आरोपींच्या अपिलांवर सुनावणी करताना न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने परिस्थितिजन्य पुराव्यांच्या आधारे दोघांचा दोष सिद्ध मानला असला, तरी फाशीची गरज नाकारली. ॲड. महेश धनावत यांनी नमूद केले की, उच्च न्यायालयाने आरोपींच्या शिक्षेचे विश्लेषण करताना गुन्ह्याचे स्वरूप आणि गुन्हेगारांचे वय या दोन्ही घटकांचा सखोल विचार केला. घटनेच्या वेळी आरोपी २५ आणि २२ वर्षांचे तरुण होते. सहज पैसे मिळवण्याच्या आणि आर्थिक हव्यासापोटी त्यांनी हे पाऊल उचलले होते. जरी हे कृत्य अत्यंत क्रूर आणि निंदनीय असले, तरी ते कायद्याच्या चौकटीत दुर्मिळातील दुर्मिळ या व्याख्येत तंतोतंत बसत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. कायदेशीर बाबींवर अधिक प्रकाश टाकताना ॲड. धनावत म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने बचन सिंग आणि मच्छी सिंग खटल्यांमध्ये घालून दिलेल्या तत्त्वांचा आधार उच्च न्यायालयाने या प्रकरणात घेतला आहे. शिक्षेचा उद्देश केवळ (पान २ वर)

# गुरूंच्या आदर्शांचा अंगीकार केल्याशिवाय आत्मविकास अशक्य : महासती निर्मलाजी म.सा.

**जालना | प्रतिनिधी :**

''गुरूंकडून प्राप्त झालेले ज्ञान केवळ ऐकण्यासाठी नसून ते जीवनात आचरणात आणण्यासाठी असते. विनय, सेवा, स्वाध्याय आणि संयम या गुणांचा स्वीकार करणारा शिष्यच गुरूंच्या शिकवणीचा खरा अधिकारी ठरतो,'' असे प्रतिपादन तपकौमुदी उपप्रवर्तिनी महासती निर्मलाजी म.सा. यांनी धर्मसभेत केले.

प्रवचनात त्यांनी गुरुपरंपरेतील महान संतांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंगांचे विवेचन करत गुरूंच्या आचरणातून मिळणाऱ्या संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. आगमाचे गाढ ज्ञान, कठोर तपश्चर्या आणि उच्च कोटीची साधना प्राप्त असूनही गुरूंनी कधीही अहंकाराला स्थान दिले नाही. उलट लहान साधू-साध्वींप्रती आदर, सेवाभाव आणि नम्रता जपत आदर्श संयमी जीवनाचा वस्तुपाठ समाजासमोर ठेवला, असे त्यांनी सांगितले.

महासती निर्मलाजी म.सा. म्हणाल्या की, गंभीर आजार, शारीरिक वेदना



छायाचित्र : दर्पण जैन

आणि प्रतिकूल परिस्थिती यांचाही गुरूंनी शांतचित्ताने स्वीकार केला. कठीण प्रसंगातही संयम, समता आणि धर्मनिष्ठा कायम ठेवत त्यांनी आपल्या आचरणातून साधनेचे सामर्थ्य जगासमोर उभे केले.

''गुरूंचे जीवन हे प्रत्येक साधकासाठी प्रेरणास्थान आणि आत्मविकासाचे जिवंत विद्यापीठ आहे,'' असेही त्यांनी नमूद केले. आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात भौतिक सुखांच्या मागे धावताना माणूस अंतर्मनातील शांती गमावत आहे. अशा परिस्थितीत गुरूंनी दिलेले संस्कार, स्वाध्याय, आत्मशिस्त, सदाचार, सेवा आणि धर्माचरण यांचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. गुरूंच्या शिकवणीनुसार जीवन जगितल्यास व्यक्तिमत्त्व समृद्ध होऊन आत्मोन्नतीचा मार्ग सुकर होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**तपआराधनेला उत्स्फूर्त प्रतिसाद**

धर्मसभेदरम्यान एकूण २०९ भाविकांनी विविध तपांची आराधना केली. त्यामध्ये १ पोरसी ३०, २ पोरसी २, नवकारसी ४९, दिवस चरम ९, एकासन ५०, एकलठाणा ८, नीवी तप १०, आयंबील १८, १ उपवास १४, अभिग्रह ११, ५ उपवास २, ६ उपवास २ आणि ७ उपवास ४ तपस्वींचा समावेश होता.

धर्मसभेला ध्यानयोगी आचार्य पूज्य शिवमुनिजी म.सा. यांच्या आज्ञानुवर्ती, आगम गगनचंद्रिका, संयम सुमेरू, गुरुणीमैया महासाध्वी कौशल्याजी म.सा. श्रमणी यांच्या प्रशिष्य तथा स्वर्ण संयमज्योती उपप्रवर्तिनी महासती प्रमिलाजी म.सा. यांच्या सुशिष्य तपकौमुदी उपप्रवर्तिनी महासती निर्मलाजी म.सा., तपचंद्रिका महासती नंदिनीजी म.सा., महासती उपमाजी म.सा., महासती उपासनाजी म.सा. तसेच महासती ऋषिताजी म.सा. (आदि ठाणा ५) यांची पावन उपस्थिती लाभली. मोठ्या संख्येने श्रावक-श्राविकांनी धर्मश्रवणाचा लाभ घेतला. प्रवचनानंतर डॉ. गादिया यांनी उपस्थितांचे आभार मानले. त्यानंतर मंगलपाठाने धर्मसभेची सांगता झाली.



जालना : भारतीय जनता पार्टी जालनाच्या वतीने पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक व जिल्हा उपाध्यक्ष स्व. चंपालाल भगत यांना भाजपा जिल्हा कार्यालयात सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपस्थित पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मौन पाळत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी फरहाना सलमान पठाण यांची निवड

**घनसावगी - प्रतिनिधी**

घनसावंगी तालुक्यातील जिल्हा परीषद प्राथमिक शाळा सौंदलगाव येथील शालेय व्यवस्थापन समिती कार्यकालाची वाढीव मुदत संपली असल्याने सन-२०२६ ते २०२८ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी नवीन शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची निवड करून समिती नव्याने गठीत करण्यात आली आहे.यासाठी



पालकांची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. सौंदलगाव येथील शालेय व्यवस्थापन समितीचे या सभेत गठन करण्यात आले. समितीच्या अध्यक्षपदी फरहान सलमान पठान वतसेच युवा सेना चे तालुका अध्यक्ष सलमान पठान अल्पसंख्यक घनसावगी व तसेच सकल मुस्लिम माहाराष्ट्र युवक तालुका अध्यक्ष सलमान पठाण घनसावंगी व तसेच टिपू सुलतान ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष सलमान पठाण घनसांगवी व पत्रकार माननीय सलमान भाई पठाण यांच्या पत्नी फरहाना सलमान पठान यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे .तसेचसमितीच्या सदस्य पदीयांची पालक प्रतिनिधी म्हणून सदस्यपदी निवड करण्यात आली . शिक्षक प्रतिनिधी (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.